www.PapaCambridge.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education
Advanced Subsidiary Level and Advanced Level

**MARATHI** **8688/02**
**9688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2007**

**1 hour 45 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

*2395860885*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer **all** questions.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are not permitted.
You should keep to any word limits given in the questions.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.

उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.

गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.

टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर ,

डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

**सर्व** प्रश्न सोडवा.

उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.

प्रश्नात नमूद केलेल्या शब्दसंख्येच्या मर्यादेत उत्तर लिहावे.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.

प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा पोट प्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

SP (SLM/TL) T24076/4
© UCLES 2007
UNIVERSITY *of* CAMBRIDGE
International Examinations

**[Turn over**

www.PapaCambridge.com

## विभाग - 1

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

स्त्री आणि पुरुष ही समाजाची अभिन्न अंगे आहेत. समाज रचनेच्या उभारणीत दोघांचाही अमोल वाटा आहे. हे सारे खरे असले तरी परंपरेने पुरुषांपेक्षा स्त्रियांना शारीरिक व बौद्धिक दृष्टया कमी दर्जाचे मानण्यात आले. प्रत्यक्षात स्त्रीचे समाजात व कुटुंबात असणारे स्थान व दर्जा नेहमीच दुय्यम राहिला. सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय बंधनांनी तिला जखडून टाकले. पिढ्यान्‌पिढ्या तिच्यावर होत असलेल्या या अन्यायाने ती खचून गेली होती.

स्त्रीयांच्या या दुःखांना वाचा फोडणारी स्त्री–स्वातंत्र्याची चळवळ सर्वप्रथम युरोपात १८ व्या शतकात सुरू झाली. मानवतावादाच्या संकल्पनेतून या चळवळीचा उदय झाला. औद्योगिक क्रांतीने तिला चालना दिली. युरोपातील स्त्री–स्वातंत्र्य आंदोलनाला चालना देण्याचे ऐतिहासिक मोलाचे कार्य मेरी वोलस्टोनने केले. कायद्याने, धर्माने व समाजाने स्त्रियांना दिलेले गौण स्थान नाकारत मेरी वोलस्टोनने त्यांना सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी ही चळवळ सुरू केली. या आंदोलनाचे लोण फ्रान्समधे पोचले. तिथल्या स्वातंत्र्यप्रेमी स्त्रियांच्या संघटनांनी स्वातंत्र्य, समता आणि मानवता या मूलभूत त्रयींची मागणी घसास लावली. पुढे १८४८ साली या चळवळीने उत्तर अमेरिकेत शिरकाव केला. प्रथमच महिला संघटित होऊन सेनेकाफॉलस येथे भरलेल्या महिला परिषदेतून त्यांनी स्त्री–स्वातंत्र्याची जोरदार मागणी केली. समान कायदा, स्वयंपूर्ण व संपूर्ण शिक्षण, व्यापार स्वातंत्र्य, नुकसान भरपाई, वेतनाचे अधिकार व मतदानाचा अधिकार पुरुषांसारखाच हवा असा ठराव संमत करण्यात आला. या मागण्यांचे लोण युरोपीय देशात पोचले. हळूहळू या मागण्यांपैकी उच्च शिक्षणाचे स्वातंत्र्य, व्यवसाय व उद्योगधंद्यात स्थान, विवाहित स्त्रियांना पैतृक संपत्तीत समान वाटा, मतदानाचा अधिकार, इत्यादी बाबींचे अधिकार, पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस युरोप, अमेरिका, इत्यादी देशांतून १९२० सालापर्यंत मिळू लागले. त्यानंतर हे आंदोलन थंडावले. १९४६ साली युनायटेड नेशन्‌सने जागतिक स्तरावर स्त्रियांच्या समान अधिकारासाठी कमिशन नेमले. त्याने स्त्रियांच्या राजकीय, आर्थिक स्वातंत्र्याबरोबरच जगातील सर्व स्त्रियांना शिक्षणाचा समान अधिकार मिळावा असा आग्रह धरला.

१९६० साली स्त्री–स्वातंत्र्य आंदोलनाचा अमेरिकेत पुनर्जन्म झाला. १९६६ साली नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर वूमेन्सची स्थापना झाली. यातून गर्भपाताचा अधिकार, सरकारतर्फे मुलांची देखरेख करणारी केंद्रे, पुरुषांच्या बरोबरीचे समान वेतन, नोकरीत बढतीची समान संधी, शिक्षणात समानता, कायदा व तसेच सामाजिक आणि आर्थिक अधिकारात समानतेची मागणी रेटण्यात आली. आता यातील जवळजवळ सर्वच मागण्यांची पूर्ती अमेरिकेने केली.

या चळवळीतून पुढे १९७० साली स्त्री–मुक्तीचा नवीन विचार करणारी चळवळ सुरू झाली. स्त्रियांच्या काही संघटनांनी आपली दृष्टी स्त्री–मुक्ती म्हणजे पुरुष वर्चस्वातून पूर्ण मुक्ती याकडे वळवली. स्त्री–पुरुष भेद दर्शवणारा भाषेतील शब्दांचा वापर बंद करणे, मुलांची जोपासना, घरकाम, धार्मिक कर्मकांड, गर्भधारणेचे स्वातंत्र्य, घटस्फोटाचे स्वातंत्र्य याबाबतीत पुरुषांच्या वर्चस्वातून मुक्ती हवी अशी मागणी रेटण्यात आली. स्वातंत्र्य आणि मुक्ती यातील भेद नीटपणे समजाऊन न घेतल्यामुळे या मागणीला अजूनही मान्यता मिळाली नाही.

www.PapaCambridge.com

**1** **पुढील शब्द वरील उताऱ्यातील असून त्यांचे विरूद्धार्थी अर्थ लिहा व त्यांचा तुमच्या वाक्यात उपयोग करा.**

**(i)** अभिन्न

**(ii)** खचून जाणे [1]

**(iii)** उच्चाटन [1]

**(iv)** वर्चस्व [1]

**(v)** मान्यता [1]

**2** **खाली दिलेली संकल्पना स्पष्ट करणारे अचूक शब्द वरील उताऱ्यातून निवडा व लिहा.**
**उदाहरणार्थ - ज्याचे मोल ठरविता येत नाही असे.**
**उत्तर - अमोल**

**(i)** एका पिढीपासून दुसऱ्या पिढी पर्यंत. [1]

**(ii)** शब्दात व्यक्त करणे. [1]

**(iii)** गती देण्याचे कार्य करणे. [1]

**(iv)** एखादा विचार सर्वांच्या मतानुसार स्वीकृत करणे. [1]

**(v)** स्त्री-पुरूष यात अंतर करणे. [1]

**3** **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. उताऱ्यातील वाक्ये व शब्द उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**

**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15+5 = 20**

**(i)** पिढ्यानपिढ्या स्त्रियांवर कोणते अन्याय करण्यात आले? [2]

**(ii)** युरोपात स्त्री-स्वातंत्र्याची चळवळ सुरू व्हायला कोणती दोन कारणे घडलीत? [2]

**(iii)** अमेरिकेत पहिल्या महिला परिषदेने कोणत्या मागण्यांचा पाठपुरावा केला? [3]

**(iv)** पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस स्त्रियांना कोणते अधिकार स्वातंत्र्य मिळाले? [3]

**(v)** युनाईटेड नेशन्सने स्त्री-स्वातंत्र्यासाठी कोणते कार्य केले? [2]

**(vi)** स्त्री-मुक्ती चळवळीचे उद्दिष्ट कोणते आहे? [3]

**एकूण गुण** [20]

www.PapaCambridge.com

## विभाग - 2

**पुढील दुसरा गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

जगातील इतर देशांप्रमाणे भारतातील स्त्रियांची परिस्थिती फारशी वेगळी नव्हती. रूढी, परंपरा, धर्मकल्पना यांनी ती जखडली होती. परंतु युरोपातील सुधारणावादी विचारांचे लोण भारतात आले आणि स्त्री-शिक्षण व स्त्री-स्वातंत्र्याचे वारे जोरात वाहू लागले. १९ व्या शतकात भारतात सुधारणावादी विचारांनी प्रभावित झालेल्या आंग्लशिक्षित सुधारकांची नवीन पिढी तयार झाली. तिने स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार हिरीरीने केला.

भारतातील महाराष्ट्र व बंगाल या प्रातांत सुधारकांची दीर्घ परंपराच निर्माण झाली. बंगालमध्ये ईश्वरचंद विद्यासागर व राजा राममोहन राय यांनी १८२९ साली सतीची प्रथा बंद करणारा कायदा सरकारकडून अंमलात आणला. महाराष्ट्रातही त्याच सुमारास लोकहितवादी, न्या. रानडे, महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, शाहू महाराज, पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-स्वातंत्र्य, स्त्री-शिक्षण इत्यादी विचारांचे जोरदार समर्थन केले. वृत्तपत्रातील लेखांतून समाज जागृती केली. ज्योतिबा फुले यांनी सर्वप्रथम १८४८ साली पुण्याला मुलींची शाळा स्थापन केली. १८५६ साली विधवांच्या पुनर्विवाहाचा मार्ग मोकळा करणारा कायदा पास झाला. १८८४ साली बालविवाह प्रतिबंधक कायदा अंमलात आला. आगरकरांनी सर्वांगीण सुधारणेचा विचार प्रथम केसरीतून व नंतर सुधारक वर्तमानपत्रातून आग्रहाने मांडला. या सुधारकांच्या प्रयत्नातूनच भारतात स्त्री-स्वातंत्र्याच्या विचारांचा पाया घातल्या गेला.

पाश्चात्य देशात पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. त्याचे पडसाद भारतातही उमटले. १९२७ साली अखिल भारतीय महिला परिषद स्थापन झाली. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात समान अधिकाराची मागणी करण्यात आली. १९४७ साली स्वातंत्र्यानंतर भारतीय घटनेने स्त्रीपुरूषांना मतदानाचा हक्क दिला. इतर सामाजिक, आर्थिक, राजकीय हक्क प्रदान केलेत. लिंगभेद पूर्ण नष्ट करण्यात आला. स्त्रिया कायदेमंडळाच्या सभासद, लोकसभेतील खासदार, मंत्री, राज्यपाल, प्रधानमंत्रीही झाल्यात. घटनेने व कायद्याने स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल केले. तरी धार्मिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक क्षेत्रातील रूढी व परंपरांच्या बंधनातून तिची पूर्ण सुटका झाली नाही.

महाराष्ट्रात व इतर प्रातांतून १९७० साली स्त्री-मुक्ती आंदोलनाने उचल खाल्ली. आजची स्त्री एक नागरिक म्हणून तिचे स्वतंत्र अस्तित्व कायद्याने मान्य केले. विचारांचे, आचारांचे, शिक्षणाचे, नोकरीचे स्वातंत्र्य म्हणजेच स्त्री-स्वातंत्र्य का? असा प्रश्न या आंदोलनकर्त्यांनी निर्माण केला. स्वातंत्र्य मग ते कोणत्याही प्रकारचे असो कायद्याने मिळविता येते. पण मुक्तीला वेळ लागतो. मुक्ती म्हणजे रूढी, परंपरा, कर्मकांड, पुरूषी वर्चस्व, लिंगभेद या जाचक बंधनातून मोकळे होऊन बंधनरहित होणे असा अर्थ चळवळकर्त्यांना अभिप्रेत आहे. कडक कायदे करूनही आजही स्त्रियांवर जे अत्याचार होत आहेत, त्यातून मुक्ती हा त्यामागचा विचार आहे. स्त्रीपुरूष नाते संबंधातील स्त्रियांच्या नैसर्गिक विकासाला वाव देणारे व जीवनाला आकार देणारे स्वातंत्र्य अपेक्षित आहे. हा स्त्री-मुक्तीचा लढा पुरूषांविरूद्ध नाही तर पुरूषीवृत्ती विरूद्ध आहे. स्त्री-मुक्तीचा लढा हा सर्वांगीण व मूलगामी सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यातील एक भाग आहे हे भान ठेवायला हवे.

www.PapaCambridge.com

**4** **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये व शब्द उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**

**प्रत्येक प्रश्नांच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15+5 = 20**

**(i)** सुधारकांची नवीन पिढी अस्तित्वात येण्यापूर्वी भारतातील स्त्रियांच्या परिस्थितीवर प्रकाश टाका [2]

**(ii)** सुधारकांच्या प्रयत्नामुळे स्त्रियांच्या हिताचे रक्षण करणारे कोणकोणते कायदे अस्तित्वात आले? [3]

**(iii)** १९४७ सालानंतर भारतीय स्त्रियांच्या परिस्थितीत कोणता योग्य बदल घडून आला? [4]

**(iv)** कायद्यानी मिळणारे स्वातंत्र्य अपूरे आहे असे स्त्री-मुक्तीची चळवळ करणाऱ्यांना का वाटते? [3]

**(v)** आंदोलन कर्त्यांना स्त्री-मुक्तीचा कोणता अर्थ अभिप्रेत आहे? [3]

**एकूण गुण** [20]

**5** **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये व शब्द उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**

**प्रत्येक प्रश्नांच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण - 15+5 = 20**

**(i)** वरील दोन्ही उताऱ्यांच्या आधारे स्त्री-स्वातंत्र्य आंदोलना नंतरही स्त्री-मुक्ती चळवळीची आवश्यकता का निर्माण झाली ते सांगून स्त्री-मुक्तीच्या उद्दिष्टांवर सविस्तर मुद्देसूद विवेचन करा. [10]

(सुमारे 140 शब्दांत )

**(ii)** तुमच्या मॉरिशस देशामधील स्त्री-स्वातंत्र्याच्या आंदोलनावर प्रकाश टाका. [5]

**एकूण गुण** [20]

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of